# विमा संस्थांनी विश्वासार्ह सेवावर भर द्यावा

## राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :

विमा हा केवळ आर्थिक उत्पादन नसून तो सामाजिक सुरक्षा, जोखीम व्यवस्थापन आणि आर्थिक स्थैर्य यासाठी अत्यावश्यक साधन आहे. भारतीय विमा ब्रोकर संघटनेसारख्या संस्थांनी नागरिकांना केवळ विमा पॉलिसीची विक्री न करता जनजागृती, सुलभ माहिती आणि विश्वासार्ह सेवा देण्यावर भर द्यावा, असे आवाहन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले.

कफ परेड येथे भारतीय विमा ब्रोकर संघटनेच्या (आयबीएआय) रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त स्थापना दिन कार्यक्रमात राज्यपाल राधाकृष्णन बोलत होते. भारतीय विमा ब्रोकर संघटनेचे अध्यक्ष नरेंद्रकुमार भरिंदवाल, राज्यपालांचे उपसचिव एस. रामामूर्ती, भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरणचे सदस्य सत्यजित त्रिपाठी, विमा समितीच्या सदस्या टी.एल. अलामेलू, आयबीएआयचे उपाध्यक्ष मोहन एस, सचिव निर्मल बजाज आदींसह शासकीय व नियामक संस्थांचे वरिष्ठ अधिकारी, विमा व वित्तीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.




राज्यपाल राधाकृष्णन म्हणाले की, ही संस्था रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत असल्याने हा आनंदाचा क्षण आहे. विमा दलाल (ब्रोकर) हे विमाधारक व विमा कंपनी यांच्यातील दुवा आहेत. ते ग्राहक केंद्रित आणि उपयोगी उपाय सूचवितात. भारत देश पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था होण्याच्या मार्गावर आहे, त्यामध्ये कॉर्पोरेट विमा सेवांचे महत्व अधोरेखित होते. ते सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्राच्या विमा उद्योगातील विस्ताराशीही संबंधित आहेत. हे सर्व राष्ट्रीय प्राधान्याचे विषय असून सुरक्षिततेची व्याप्ती आणि परस्पर सहकार्य विमा क्षेत्रातही महत्वाचे आहे. भारत क्षमतेचा विकास, ज्ञानाचे वाटप, आणि तंत्रज्ञानाचा स्वीकार यामध्ये सक्रियपणे सहभागी होत आहे. विम्याचे भविष्य डेटा उपक्रमांमध्ये, ग्राहकांच्या सूचीबद्धतेमध्ये असल्याने आयबीएआयने यामध्येही सहभागी होवून भविष्यातील अर्थव्यवस्थेचे प्रेरणास्थान बनावे,असेही राज्यपाल राधाकृष्णन यांनी सांगितले.

युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील. राज्यातील विद्यापीठात आयबीएआयसोबत संयुक्तपणे विमा शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्याचा मानस राज्यपाल राधाकृष्णन यांनी व्यक्त केला. यावेळी आयबीएआयच्या २५ वर्षांतील स्मरणिकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन, लोगोचे अनावरण झाले. भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरणचे सदस्य सत्यजित त्रिपाठी, विमा समितीच्या सदस्या टी.एल. अलामेलू यांनीही विचार व्यक्त केले. अध्यक्ष भरिंदवाल यांनी प्रास्ताविक केले.

## राष्ट्रीय सहकार धोरणातून सहकार क्षेत्रात नवी क्रांती : आ. प्रविण दरेकर



**मुंबई:** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी जाहीर केलेल्या राष्ट्रीय सहकार धोरणाचे सहकार क्षेत्रातून उत्स्फूर्त स्वागत होत आहे. भाजपा गटनेते आणि मुंबई जिल्हा बँकेचे अध्यक्ष आमदार प्रविण दरेकर यांनी या धोरणाचे स्वागत करताना राष्ट्रीय सहकार धोरणाच्या माध्यमातून देशात एक नवी सहकारी क्रांती घडणार आहे, असा विश्वास व्यक्त केला. या धोरणाची वैशिष्ट्ये सांगताना आ. दरेकर म्हणाले की, देशातील प्रत्येक जिल्ह्यात एक सहकार गाव विकसित केले जाणार आहे. दहा वर्षात सहकार क्षेत्राचा सकल राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा तिपटीने वाढवला जाईल. पुढील २५ वर्षांसाठी सहकार क्षेत्राच्या वाटचालीचा कृती आराखडा तयार करण्यात आला असून, प्रत्येक गावात सहकारी संस्थांची जाळी उभारली जाणार आहे. महिला आणि तरुणांना केंद्रबिंदू मानून सहकारातून सक्षम करण्यावर भर देण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. राज्यांनी राष्ट्रीय सहकार धोरणाच्या धर्तीवर आपले राज्य सहकार धोरण तयार करणे आवश्यक आहे, असेही दरेकर म्हणाले.

## मुलींच्या घोळक्यात घुसली कार
# एकीचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, कोल्हापूर, दि. २५ :

कोल्हापुरातून एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. भरधाव वेगात आलेल्या एका चारचाकीने महाविद्यालयीन विद्यार्थिनींना धडक दिली, ज्यात एका विद्यार्थिनीचा दुर्दैवी मृत्यू झाला असून तीन जणी गंभीर जखमी झाल्या आहेत. ही घटना कुरुंकली भोगावती कॉलेजच्या रिक्वेस्ट बस स्टँडजवळ घडली. अपघातात मृत्यू झालेल्या विद्यार्थिनीचं नाव प्रज्ञा दशरथ कांबळे (वय १८, रा. कौलव) असं आहे. जखमी झालेल्या इतर विद्यार्थिनींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. कॉलेज सुटल्यानंतर बस स्टँडवर थांबलेल्या विद्यार्थिनींच्या घोळक्यात भरधाव कार घुसल्याने हा दुर्दैवी अपघात घडला, ज्यात एका विद्यार्थिनीचा मृत्यू झाला तर तिघी गंभीर जखमी झाल्या.

## युती-आघाडीने काय करावे हा त्यांचा प्रश्न
### मनसेची निवडणुकीची तयारी सुरू : बाळा नांदगावकर



**मुंबई :** महायुती आणि महाआघाडीने काय करावे हा त्यांचा विषय आहे. मात्र आम्ही आमच्या हिशोबाने निवडणुकीची तयारी करत असल्याचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख बाळा नांदगावकर यांनी म्हटले आहे. मनसेच्या वतीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीनंतर नांदगावकर पत्रकारांशी बोलत होते. या वेळी मराठी भाषा आणि महाराष्ट्राचा अपमान करणाऱ्या भाजप खासदार निशिकांत दुबे यांना जाब विचारणाऱ्या महा विकास आघाडीच्या महिला खासदारांचे त्यांनी अभिनंदन केले. बाळा नांदगावकर यांनी या वेळी मराठी भाषा आणि महाराष्ट्राचा अपमान करणाऱ्या भाजप खासदार निशिकांत दुबे यांना जाब विचारणाऱ्या महा विकास आघाडीच्या महिला खासदारांचे त्यांनी अभिनंदन केले. ते म्हणाले की, मराठी भाषेचा आणि महाराष्ट्राचा अपमान करणाऱ्यांविषयी महिलांच्या मनात काय राग असतो? खासदार वर्षा गायकवाड, प्रतिभा धानोरकर आणि शोभा बच्छाव यांनी हे दाखवून दिले असल्याचे ते म्हणाले.

## मत्स्यखाद्य खरेदीसंदर्भात नवीन मार्गदर्शक सूचना लागू : नितेश राणे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :

मत्स्यखाद्य खरेदीसंदर्भात नवीन सूचनांमुळे राज्यातील मत्स्य प्रकल्प अधिक कार्यक्षम होतील तसेच स्थानिक उत्पादकांनाही चालना मिळेल. गुणवत्तापूर्ण व सुरक्षित मत्स्यखाद्यामुळे उत्पादनात वाढ होऊन राज्यातील मत्स्यव्यवसाय अधिक सक्षम व स्वावलंबी होईल, असा विश्वास मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे व्यक्त केला आहे.

मत्स्यव्यवसाय विभागाच्या मत्स्यखाद्य खरेदीसंदर्भात नवीन मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने आयोजित पत्रकार परिषदेत राणे बोलत होते. मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे म्हणाले, सध्याच्या स्थितीत मत्स्यखाद्य मुख्यतः राज्याबाहेरून आयात करण्यात येत आहे. त्यामुळे स्थानिक उत्पादकांना प्रोत्साहन देण्यासाठी व गुणवत्तेवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागाने मार्गदर्शक सूचना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्रातील मत्स्यव्यवसाय वाढविण्याच्या दृष्टीने केंद्र व राज्य शासनाच्या अर्थसहाय्याने विविध प्रकल्प उभारण्यात आले आहेत. यामध्ये मत्स्यबीज उत्पादन व संवर्धन केंद्र, पिंजरा मत्स्यसंवर्धन प्रकल्प, बायोफ्लॉक, रास पद्धती व संगोपन तलाव आदींचा समावेश आहे. या प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गुणवत्तापूर्ण मत्स्यखाद्याची आवश्यकता आहे. राज्यातील सर्व अनुदानित मत्स्य प्रकल्पांनी केवळ राज्यातील केंद्र पुरस्कृत, राज्य शासनाच्या पथदर्शी, मत्स्यखाद्य खरेदी करणे बंधनकारक राहील, असे मंत्री राणे म्हणाले.

या सूचनानुसार मत्स्यखाद्य भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण प्रमाणित असणे गरजेचे आहेत. त्यावर प्रथिन, स्निग्ध, आर्द्रता, कर्बोदके इत्यादी पोषणमूल्यांचे विश्लेषण व उत्पादन तारीख, कालबाह्यता तारीख पॅकिंगवर स्पष्टपणे नमूद असावी.

# भाषा हे संवादाचे साधन, विवादाचे नाही
## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते राजधानी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र तसेच कुसुमाग्रज मराठी अध्यासन केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी एसएफआय विद्यार्थी संघटनेने महाराष्ट्रात सुरू असलेल्या भाषिक वादाच्या निषेधार्थ घोषणाबाजी केली. त्यानंतर उद्घाटन सोहळ्यानंतर भाषणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, भाषा हे संवादाची साधन आहे, विवादाचे नाही.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, भाषा हे संवादाचे साधन आहे विवादाचे नाही. भाषेच्या माध्यमातून ज्ञानाचा खजिना पोहोचतो. प्रत्येकाला मराठीचा अभिमान असलाच पाहिजे पण त्याच सोबत इतर



भाषांचा देखील आपण सन्मान ठेवला पाहिजे. आपण भारतीय भाषांना विरोध करतो आणि इंग्रजी भाषेच्या पायघड्या घालतो. हे पाहून दुःख होते. आपल्याला भारतीय भाषा आलीच पाहिजे. आपल्याकडे तमिळ भाषा सर्वात जुनी आहे, त्याचा देखील आपल्याला अभिमान वाटला पाहिजे. आपल्या मातृभाषेचा अभिमान असलाच पाहिजे. मराठी माणूस हा संकुचित विचार करूच शकत नाही, कारण शिवरायांनी आपल्याला हे कधीच शिकवले नाही.

दरम्यान, देवेंद्र फडणवीस गो बॅक म्हणत जेएनयूच्या विद्यार्थ्यांनी घोषणाबाजी केली. महाराष्ट्रात जनसुरक्षा विधेयकास मंजुरी दिल्याच्या विरोधात आणि हिंदी भाषा सक्तीच्या करण्याच्या विरोधात आम्ही एकत्र येत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्याच्या दिल्ली, जेएनयू दौऱ्याला विरोध करत असल्याचे आंदोलक विद्यार्थ्यांनी बोलताना म्हटले. पुढे बोलताना आंदोलक म्हणाले, समाजात विष कालवण्याचे काम महाराष्ट्रातील राजकारण्यांकडून होत आहे, द्वेष पसरवण्याचे काम केले जात आहे, मुस्लिमांना टार्गेट केले जात आहे. शिवाजी महाराजांचे नाव देऊन तुम्ही समाजात तेढ निर्माण करण्याचे काम करत आहात, असे म्हणत एसएफआयच्या विद्यार्थ्यांनी आपला विरोध दर्शवला.

## उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांना जबरदस्तीने हटवण्यात आले : पृथ्वीराज चव्हाण



**पुणे :** उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी सोमवारी प्रकृती अस्वास्थ्याचे कारण देत राजीनामा दिला होता. मात्र अवघ्या एका तासात त्यांनी अचानक राजीनामा का दिला, असा सवाल विरोधकांकडून उपस्थित करण्यात आला. धनखड यांचा 'पत्ता कट' करण्यात आल्याचा आरोपही करण्यात येत आहे. सरकारमधील वरिष्ठ नेतृत्वासोबत झालेल्या मतभेदांनंतर त्यांना तातडीने राजीनामा द्यावा लागल्याचा दावा केला जात आहे. या पार्श्वभूमीवर माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी मोठा घणाघात केला आहे. धनखड यांनी स्वेच्छेने राजीनामा दिलेला नाही, तर त्यांना जबरदस्तीने पदावरून हटवण्यात आले, असा ठपका त्यांनी ठेवला आहे. दिल्लीतील राजकीय घडामोडींवर त्यांनी ठाम प्रतिक्रिया नोंदवली आहे. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, उपराष्ट्रपती धनखड यांनी राजीनामा दिला नाही, त्यांना काढून टाकण्यात आले आहे. अंतर्गत वादामुळे दुर्दैवी पद्धतीने त्यांना पदावरून काढण्यात आले. धनखड यांना राजकीय हेतूने उपराष्ट्रपती पदावर बसवले होते, तेच मुळात चुकीचे होते.

# सिएमआर मिलींग भ्रष्टाचाराचा पैसा मुख्यमंत्री सहायता निधीत
### भाजपाच्या प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीने शहरात चर्चेला उधाण

■ महासागर प्रतिनिधी, देसाईगंज, दि. २५ :

पणन हंगाम २०१८-१९ पासुन सातत्याने आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान खरेदी गैरव्यवहार प्रकरणात दोषी आढळून आला असलेला देसाईगंज येथील कथित उद्योगपती तथा नव्यानेच खास पद निर्माण करून सातत्याने छत्रछायेखाली वाचुन असलेला देसाईगंज येथील छोट्या बागडबिल्ल्याने नुकतेच मुख्यमंत्री सहायता निधीत लाखो रुपयाचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुपूर्द केला आहे. सिएमआर मिलींगच्या प्रचंड गैरव्यवहारात अनेकदा अडकुन अद्यापही कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याने भाजपाच्या प्रमुख स्थानिक नेत्यांच्या प्रमुख उपस्थितीत सदरचा धनादेश देण्यात आला असताना सिएमआर मिलींग भ्रष्टाचाराचा पैसा मुख्यमंत्री सहायता निधीला दिला गेला असल्याने करण्यात येत असलेल्या गैरव्यवहारास भाजपाच्या नेत्यांची मुक संमती तर नाही ना? या एकाच चर्चेला आता देसाईगंज शहरात चांगलेच उधाण येऊ लागले आहे.

अन्न सुरक्षा कायद्याअंतर्गत देशातील गोरगरीबांना दोन वेळचं पौष्टिक अन्न खायला मिळावे या उदात्त हेतुने स्थानिक सरकारी स्वस्त धान्य दुकानातून गोरगरीबांना अलिकडे प्रती युनिट ५ किलो तांदूळ मोफत पुरविल्या जात आहे.केंद्रात भाजपा प्रणित सरकार असुन देशातील तब्बल ८० कोटी लोकांना मोफत धान्य दिल्या जात असल्याचा केन्द्र सरकारकडून तसेच राज्य सरकारकडून ढोल पिटल्या जात आहे.मात्र गोरगरीबांना देण्यात येत असलेला मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ फोटीफाईड तांदळाला बगल देत तांदूळ पुरवठा करण्याच्या गोरखधंद्याचा छोटा बागडबिल्लाच मास्टरमाईंड असल्याचे वारंवार पकडण्यात येत असलेल्या मानवी खाण्यास अयोग्य तांदळाच्या नमुन्यावरून सिद्ध होऊन देखिल शासकीय स्तरावरुन कुठलिच ठोस कारवाई करण्यात येत नसल्याने कथित छोट्या बागडबिल्लूयास वाचविण्यात मौलिक भुमिका बजावणारे भाजपाचे स्थानिक पदाधिकारीच तर नाही ना?असा प्रश्न आता यामुळे उपस्थित केल्या जाऊ लागला आहे.

जिल्ह्याच्या कुरखेडा येथील शासकीय गोदामात तसेच गडचिरोली येथील शासकीय गोदामात चक्क मानवी खाण्यास अयोग्य तांदळाचा पुरवठा केल्या गेल्या प्रकरणी संबंधित विभागाच्या दोन अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे.तसेच देसाईगंज येथील शासनाने सिएमआर तांदुळ जमा करण्याकरीता किरायाने घेतलेल्या खाजगी आकाश अग्रवाल गोडाऊन मधुन अहेरी व मुलचेरा येथील शासकीय गोदामात पुरवठा करण्यात आलेला मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ गोदाम व्यवस्थापकाने स्विकारण्यास नकार दिल्याची गंभीर बाब चव्हाट्यावर आली आहे.

## अल्पवयीन मुलीवर वडिलांसह दोघांचा अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :

अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी पोलिसांनी पीडित मुलीचे वडील व बहिणीच्या पतीविरोधात बलात्कार व बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी बहिणीच्या पतीला अटक केली असून गुन्हा दाखल झाल्यानंतर वडिलांनी पळ काढला आहे. पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

पीडित मुलगी १६ वर्षांची आहे. तक्रारीनुसार एप्रिल २०२४ मध्ये पीडित मुलगी घरी झोपली असताना आरोपी पित्याने तिच्या तोंडावर कपडा बांधून लैंगिक अत्याचार केला. तसेच हा प्रकार कोणाला सांगितल्यास तुज्या आईला ठार मारेन, अशी धमकी दिली. त्यामुळे पीडित मुलगी घाबरली व तिने हा प्रकार कोणालाही सांगितला नाही. त्यानंतर मार्च महिन्यात पीडित मुलगी घरी झोपली. घरात ती एकटीच असल्याचे पाहून आरोपीने तिच्याशी अश्लील कृत्य केले. पीडित मुलीने नुकतीच पोलिसांकडे तक्रार केल्यांनतर बलात्कार व पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

## महायुती सरकारचा रिमोट कंट्रोल दिल्लीत : संजय राऊत

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :

मंत्रिमंडळामध्ये कुणाला ठेवायचे आणि कुणाला वगळायचे हा सर्वस्वी मुख्यमंत्र्यांच्या अधिकार आहे. मात्र या सरकारचा रिमोट कंट्रोल दिल्लीमध्ये आहे. काल मुख्यमंत्री दिल्लीत गेले कार्यक्रमाचे नाव असले तरी त्यांच्या मंत्रिमंडळाची जी अवस्था झाली आहे त्यावर मार्ग काढण्यासाठी ते दिल्लीत गेले आहे, असे उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे.

संजय राऊत म्हणाले की, मी गेली अनेक दिवस सांगत आहे राज्यातील 4 मंत्री मंत्रिमंडळातून बाहेर जाणार आहेत. यात संजय शिरसाट, योगेश कदम, यांचे नाव जोडले गेले आहे.पण आता संपूर्ण मंत्रिमंडळाची सफाई करत नवे मंत्रिमंडळ आणावे अशी चर्चा दिल्ली आणि मुख्यमंत्री यांच्या वतुर्ळात सुरू आहे. संजय राठोड यांना सुद्धा जावे लागणार आहे.

संजय राऊत म्हणाले की, भ्रष्टाचार, शेतकऱ्यांच्या विरोधात वक्तव्य लेडीज बार, घोटाळे,



पैशाच्या बॅगा घेऊन बसणे यामुळे सरकारची प्रतिमा बिघडलेली आहे. याचे ओझं देवेंद्र फडणवीस यांना पेलवत नाही आणि फेकताही येत नाही अशी त्यांची परिस्थिती झाली आहे. त्यांचे 137 चे संख्याबळ आहे त्यांना असे वाकण्याची गरज नाही तरीही ते वाकले आहेत. ते त्यांचे काम करत आहे, झारखंडमधून एक पथक आले आणि अमित साळुंके नावाच्या व्यक्तीला अटक करत घेऊन गेले. 800 कोटी रुपयांचा रुग्णवाहिका घोटाळा 100 कोटींचे टेंडर 800 कोटी रुपयांना दिले गेले. 108 नंबर रुग्णवाहिकेच्या अनुषंगाने जो घोटाळा झाला त्या प्रकरणात अमित साळुंके होते, त्यांना अटक करण्यात आली आहे.

## माझे गुलाबी गप्पा मारण्याचे वय नाही
### एकनाथ खडसे यांचा गिरीश महाजनांवर पलटवार



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा आमदार एकनाथ खडसे यांनी कथित हनी ट्रॅपच्या मुद्यावरून पुन्हा एकदा भाजप नेते गिरीश महाजन यांच्यावर निशाणा साधला आहे. आता माझे वय गुलाबी गप्पा मारण्याचे नाही. पण गिरीश महाजन यांनी हनी ट्रॅपच्या प्रकरणातील संशयित प्रफुल्ल लोढा याचे हॉटेलवर नेऊन पाय दाबले. त्याच्यावर दबाव टाकला. फडणवीस नसते तर आज तुमची किंमत गल्लीतल्या कुत्र्याएवढी पण नसती, असे ते म्हणालेत. एकनाथ खडसे व गिरीश महाजन यांच्यात हनी ट्रॅप प्रकरणातील संशयित प्रफुल्ल लोढा याच्यावरून रान पेटले आहे.

## लोकाभिमुख शासनाच्या भूमिकेत महसूल अधिकाऱ्यांचे महत्त्वपूर्ण योगदान : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे
# अहिल्यानगर जिल्ह्यातील कामांचा घेतला आढावा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :

शासनाचे काम गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख होण्यासाठी महसूल विभागातील अधिकाऱ्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. यासाठी तलाठी, तहसीलदार, मंडळ अधिकारी यांनी जनसंवाद, लोकशाही दिन, लोकअदालत आदी माध्यमातून आणि विशेष शिबिरे आयोजित करुन नागरिकांपर्यंत पोहोचावे आणि त्यांच्या अडचणी सोडवाव्यात, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील महसूल विभागाशी संबंधित कामांचा आढावा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेतला. यावेळी मंत्रालयातील अधिकाऱ्यांसह अहिल्यानगर जिल्ह्यातील महसूल अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, राज्य शासनाच्या 150 दिवसांच्या कृती कार्यक्रमाअंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेत 30 लाख घरांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमित करुन लाभार्थ्यांना पट्टे वाटप करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी. घरकुलांना वाळू उपलब्ध करुन देण्यासाठी 30 एप्रिल रोजीच्या मार्गदर्शक सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. भूमि अभिलेख विभागाच्या आधुनिकीकरणासाठी जिल्हा नियोजन




समितीमधून निधी उपलब्ध करुन घ्यावा. पाणंद, शिवपाणंद रस्ते 12 फुटांचे करुन त्यांना क्रमांक द्यावेत तसेच दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात यावी. अर्धन्यायिक प्रकरणांच्या सुनावण्यांसाठी लोकअदालतीसारखे उपक्रम राबवून सर्व सुनावण्या येत्या तीन महिन्यात पूर्ण कराव्यात, असे त्यांनी सांगितले.

जिवंत सातबाराअंतर्गत नोंदी अद्ययावत करणे, तुकडेबंदी, शेतरस्ता, भोगवटादार 2 मधून 1 मध्ये करण्याची तसेच आकारी पड जमिनीची प्रकरणे, स्वामित्व योजनेचा लाभ देणे आदी कामे विषयानुसार शिबिरांचे आयोजन करुन कालबद्धरितीने मार्गी लावावीत, असे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या गौण खनिजांचे ड्रोनच्या माध्यमातून सर्वेक्षण करावे असे सांगून ज्यांनी अवैध उत्खनन केले असेल त्यांच्याविरोधात महसूल आणि पोलीस विभागामार्फत कारवाई करण्याचे आदेश मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ सुलभतेने मिळावा यादृष्टीने ॲग्रीस्टॅक मध्ये नोंदणी वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्यासह जिल्ह्यातील महसूल अधिकाऱ्यांनी यावेळी सुरू असलेल्या विविध कामांचा अहवाल सादर केला.

## कारने दोन दुचाकींना उडवले

■ महासागर प्रतिनिधी, बिडकीन, दि. २५ :

बिडकीन-पैठण रोडवर टेक्नो क्राफ्ट कंपनीसमोर गुरूवारी (दि. २४) सकाळी साडेनऊच्या सुमारास तिहेरी अपघात झाला. भरधाव कारने दोन दुचाकींना पाठीमागून धडक दिली. यात तिघेजण गंभीर जखमी झाले. त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

विठ्ठल गावंडे हे दुचाकीवरून (एमएच २० डीके ८०४७) पैठणकडे जात होते. टेक्नो कंपनीसमोर त्यांच्या दुचाकीला पाठीमागून भरधाव येणाऱ्या कारने (एमएच २० एफपी ९१३०) ने जोरदार धडक दिली. त्यामुळे गावंडे रस्त्याच्या बाजूच्या नालीत जाऊन पडले. यानंतर हीच कार बिडकीन येथील अश्रफ पत्तू शेख आणि त्यांचा मुलगा रेहान अश्रफ शेख यांच्या दुचाकीला (एमएच २० जीएन ४२०८) धडकली. ही दुचाकी सुमारे पन्नास फूट फरफटत गेली. शेवटी कार रस्त्याच्या कडेला एका वळणावर अडकून थांबली. अपघाताचा आवाज ऐकून नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमींना संभाजीनगरातील रूग्णालयात पाठविले होते.

## कारगिल विजय दिवस
# नव्या पिढीसाठी प्रेरणादायक वीरगाथा

परमवीर चक्र विजेते सूभेदार मेजर (मानद कॅप्टन) योगेंद्र सिंह यादव हे कारगिल युद्धातील सगळ्यात कमी वयाचे भारतमातेचे सुपुत्र. केवळ वयाच्या १६व्या वर्षी त्यांनी भारतीय सैन्यात प्रवेश केला. वयाच्या १८व्या वर्षी कारगिल युद्धात सहभागी होण्याचे भाग्य त्यांना लाभले. त्यावेळी ते स्पेशल कमांडो युनिट घातक प्लाटूनचे सदस्य होते, या युनिटमधे ७ शूरवीर सैनिक होते. ज्यांना शत्रूच्या बंकरवर ताबा मिळवण्याचे अत्यंत कठीण आणि जोखमीची कामगिरी सोपविण्यात आली होती.

या युनिटला टायगर हिलवर जाण्याचे आदेश मिळाले. टायगर हिल म्हणजे जवळजवळ सरळ ९० अंशाचे चढण, पूर्ण बर्फाच्छादित प्रदेश, थंड हवामान आणि त्याचवेळी मोठ्या प्रमाणावर गोळ्यांचा आणि बॉंबांचा वर्षाव शत्रूकडून सुरू होता. या परिस्थितीत हे ७ शूरवीर पुढे सरसावत होते. केवळ ७ जवानांनी शत्रूच्या २५-३० सैनिकांचा निःपात केला आणि त्यांचे मोठे नुकसान करून महत्त्वाचे क्षेत्र ताब्यात घेतले. या दरम्यान कॅप्टन योगेंद्रच्या सर्व साथीदारांना वीरगती प्राप्त झाली. कॅप्टन योगेंद्र सिंह यादव यांना १७ गोळ्या लागल्या होत्या. क्रूर पाकिस्तानी सैनिकांनी मृत भारतीय जवानांवर पुन्हा गोळ्या झाडल्या.

यामध्ये जखमी कॅप्टन योगेंद्र यांच्या छातीत गोळी लागली, परंतु खिशात असलेल्या ५ रुपयांच्या नाण्यामुळे ती गोळी थांबली. अशा स्थितीतही कॅप्टन योगेंद्र सिंह यादव या लपून, वारंवार जागा बदलून, कधी बंदुकीच्या तर कधी बॉंबच्या साहाय्याने शत्रूवर हल्ले सुरूच ठेवले. यामुळे शत्रूला वाटले की भारतीय सेनेची नवीन तुकडी आली आहे, त्यामुळे शत्रूने तिथून पळ काढला. कॅप्टन योगेंद्र सिंह यादव यांच्या या अति विलक्षण शौयार्मुळे त्यांना ' परमवीर चक्र' देऊन सन्मानित करण्यात आले. ते लहान वयात ' परमवीर चक्र' प्राप्त करणारे सैनिक आहेत. त्यांच्या समोर लहान वया पासूनच राष्ट्ररक्षणाचे ध्येय होते.

हा गौरवशाली इतिहास आपण आपल्या मुलांना शाळेत किंवा घरी कुठेही शिकवत नाही. त्यामुळे दुर्दैवाने आजची पिढी स्वतःचा शौर्यपर वारसा विसरत चालली आहे. त्यांच्या पुढे कुठलेही ध्येय नाही.त्यामुळे आजचे बरेचसे युवक 'हिट अँड रन', विविध प्रकारचे गुन्हे, तस्करी, प्रेमप्रकरणे, व्यसनाधीनता यामध्येच अडकले आहेत.

अजूनही वेळ गेलेली नाही. पुढील पिढीला वाचवायचे असेल आणि आजच्या युवकांना विनाशाच्या मार्गावरून परावृत्त करायचे असेल, तर भारताच्या या शूरवीरांचा इतिहास अगदी बालपणापासून शाळेत आणि घरीसुद्धा सांगायला हवा. तेव्हाच त्यांच्या मनात राष्ट्रप्रेम निर्माण होईल आणि हीच जागृत झालेली युवा पिढी उज्ज्वल भारताचे शिल्पकार ठरेल. वीरगती प्राप्त झालेल्या सर्वच सैनिकांना हीच खरी श्रद्धांजली ठरेल.

**सौ. प्रांजली विजय ब्रम्हे, नागपूर**

## ४ ऑगस्ट रोजी लोकशाही दिन

**चंद्रपूर, दि. २५ जुलै :** सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी आणि अडचणी यांची न्याय व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन तर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी तालुका स्तरावर तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. ऑगस्ट महिण्याचा पहिला सोमवार दि. ४ ऑगस्ट रोजी येत असल्याने लोकशाही दिनाचे आयोजन दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे करण्यात येईल. जिल्हास्तरीय लोकशाही दिनात तक्रार सादर करतांना विहीत नमुन्यातील तक्रार अर्जासोबत तालुका लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची प्रत सादर करावी.

## बेकायदेशीरपणे व्यवसाय करणाऱ्या हॉटेलवर कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २५ जुलै :** ओयो ब्रॉण्ड आणि लोगोचा दुरुपयोग करुन व्यवसाय करणारे हॉटेल, लॉजेस चालक, मालकांविरुध्द चंद्रपूर शहर पोलीसांनी गुन्हा नोंद केला आहे.अहमदाबाद येथील ओयोचे नोडल अधिकारी मनोज पाटील यांनी दिनांक १८ जुलै रोजी फिर्यादी पोलीस स्टेशन चंद्रपूर शहर येथे लेखी रिपोर्ट दिला की, OYO Hotel & Homes Pri. Ltd. 1/- ही कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत नोंदणीकृत कंपनी असुन OYO ROOMS ट्रेडमार्क व्यापार चिन्हा अधिनियम १९९९ प्रमाणे व्यापार चिन्ह रजिस्टर झालेली आहे. ओयो हॉटेल हे बजेट लॉजिंग बुक करण्यासाठी तंत्रज्ञानावर आधारित प्लॅटफॉर्म आहे. ओयो कंपनीचा OYO ब्रॉण्ड व लोगो बनावट बनवुन त्याचा दुरुपयोग केला जात आहे.

# रस्त्याच्या बाजूला नालीचे बांधकाम नसल्याने शेतकऱ्याच्या शेतात पाणीच पाणी

### शेतकऱ्याच्या पिकांचे नुकसान, सार्वजनिक बांधकाम विभागाने नुकसानभरपाई द्यावी - शेतकऱ्यांची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. २५ जुलै :** नुकतेच चिमूर नेरी महामार्गाचे बांधकाम करण्यात आले मात्र दोन्ही बाजूला पाणी जाण्यासाठी नाल्याचे बांधकाम केले नसल्याने शेत आणि रस्ता एकच झाल्याने पाण्याचा निचरा होण्यासाठी मार्ग राहिला नसल्याने शेतातील पाणी शेतात तुडूंब भरला असून तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहे त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे अतोनात नुकसान होत आहे.



सदर प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाला आणि कंत्राटदाराला सदर बाबतीत तक्रार केली असता जेसीपी पाठवून छोटीशी पाणी काढण्यासाठी नाली खोदण्यात आली आहे मात्र या नालीतून पुरेसे पाणी जात नसल्याने शेतात पाणीच पाणी आहे तेव्हा शेतकरी संतापले असून सार्वजनिक बांधकाम विभागाने नुकसानभरपाई द्यावी आणि तात्काळ नाली बांधकाम करावा अशी मागणी करीत आहेत

नेरी परिसरातील डी एड कॉलेज परीसरातील अनेक शेतातर स्त्याला नाली नसल्याने सर्वत्र पाणीच पाणी आहे मात्र सार्वजनिक बांधकाम विभाग झोपेचे सोंग घेऊन उभा आहे तात्पुरता पाणी काढण्यासाठी जेसीपी पाठवून शेतकऱ्यांचे बोळवण करण्यासाठी थातुरमातुर नाली खोदली जात आहे परंतु पाणी चा निचरा ज्या पद्धतीने व्हायला पाहिजे तो होत नसल्याने शेतकरी वर्ग संताप व्यक्त करीत आहे वास्तविक महामार्ग बांधकाम करण्याअगोदर नालीचे बांधकाम करायला पाहिजे होते मात्र आधी रस्ता बांधकाम करण्यात आला आणि नाली बांधलीच नसल्याने बांधकाम विभागाचा प्रताप या ठिकांनी दिसत आहे.

तात्काळ नाली बांधकाम करावा आणि पिकाची नुकसान भरपाई सार्वजनीक बांधकाम विभागाने द्यावी अशी मागणी शेतकरी वर्ग करीत आहे.

## ३ ठिकाणी घरफोडी करणारा आरोपी अखेर पोलिसांच्या ताब्यात



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. २५ जुलै :** दि. २३ जुलै ला सूर्य मंदीर वार्ड भद्रावती येथे घराचे कुलूप तोडून चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या इसमाची माहिती मिळताच भद्रावती पोलिसानी घटनास्थळी अटक केली आहे.

सूर्य मंदीर वार्ड येथे गोवर्धन पांडे यांचे घरी रात्री दरम्यान चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपी ला अटक केली आहे, प्रमोद गेडाम वय ३२, रा घोन्सा भद्रावती असून त्याचे विरुद्ध विविध कलमान्वे भद्रावती पोलिसात गुन्हा नोंदविला आहे. सदर आरोपीला पोलिसानी विचारपुस् केली असता त्याने ३ ठिकाणी घरफोडी केल्याची कबुली केली असून आरोपी कडुन सोने चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण २,५०,१०० चा मुद्देमाल ज़प्त केला आहे. ही कारवाई जिल्हा पोलिस अधिक्षक यांचे मार्गदर्शनात भद्रावती पोलिस निरीक्षक योगेश्वर पारधे, सपोनि विरेंद् केदारे, गुन्हे अन्वेषण विभाग पोनि गजानन तुपकर, जगदीश् झाडे, योगेश घाटोड़े, विश्वनाथ चुदरी, अनुप अष्टुनकर, महेंद्र बेसरकर, भुषण चौधरी यानी केली आहे

## उद्या शनिवारी राज्याचे बांधकाम मंत्री छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले चंद्रपुरात

### देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताह निमित्त आयोजित कार्यक्रमांमध्ये राहणार उपस्थित

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २५ जुलै :** आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून चंद्रपूर मतदारसंघात देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहांतर्गत शनिवारी आयोजित विविध कार्यक्रमांमध्ये राज्याचे बांधकाम विभागमंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. ते सकाळी ९ वाजता नागपूरमार्गे चंद्रपूरात पोहोचणार आहेत.



२८ तारखेला राज्यातील सर्वात मोठ्या प्राचीन शिवलिंगाजवळ जलाभिषेक व रुद्राभिषेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. येथेही उद्या सकाळी १०.३० वाजता मंत्री भोसले भेट देत शिवलिंगाचे दर्शन घेणार आहेत. त्यानंतर ११ वाजता ते माता महाकाली मंदिर येथे जाऊन मातेचे दर्शन घेतील. ११.३० वाजता शिवाजी चौकात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जीवनपटावर आधारित प्रदर्शनीचे उद्घाटन मंत्री छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर दुपारी १२ वाजता बालाजी सभागृह येथे होणाऱ्या कार्यकर्ता मेळाव्यास ते संबोधित करतील.

## 'मोतिबिंदू मुक्त महाराष्ट्र' या शस्त्रक्रिया मोहिमेचा शुभारंभ

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २५ जुलै :** राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत २२ जुलै ते २२ ऑगस्ट २०२५ या कालावधीत 'मोतिबिंदू मुक्त महाराष्ट्र' ही मोहीम संपूर्ण राज्यात राबविण्यात येत आहे. दूरदृष्यप्रणालीद्वारे आरोग्य विभागाच्या राज्यमंत्री मेघना साकोरे (बोर्डीकर) यांच्या हस्ते राज्यस्तरीय उद्घाटन झाल्यानंतर जिल्हा सामान्य रुग्णालय येथे सुध्दा सदर मोहिमेचा नुकताच शुभारंभ करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ महादेव चिंचोळे, उद्घाटक म्हणून डॉ. मंगेश गुलवाडे तर प्रमुख पाहुणे म्हणून, अति. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भास्कर सोनारकर, जिल्हा नेत्र शल्य चिकित्सक डॉ. तारासिंग आडे, निवासी वैद्यकिय अधिकारी डॉ. हेमचंद कन्नाके, नेत्र शल्य चिकित्सक डॉ. उल्हास सरोदे, डॉ. जिनी पटेल, विशाल निंबाळकर उपस्थित होते.

मोतीबिंदुची वाढती संख्या व सर्वसामान्य जनतेपर्यंत सेवा पुरविण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण व दृष्टी क्षीणता कार्यक्रम अंतर्गत चंद्रपुर जिल्ह्यात एकूण ९८ मोतिबिंदु शस्त्रक्रिया करून शुभारंभ करण्यात आला.अध्यक्षीय भाषणात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. चिंचोळे म्हणाले, या मोहिमेदरम्यान जिल्ह्यात ५८ शिबिरांचे आयोजन करण्यात येत असून २ हजार मोतिबिंदु शस्त्रकिया करण्याचे उद्दिष्ट आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा नेत्र शल्य चिकित्सक डॉ. तारासिंग आडे यांनी केले. संचालन नेत्रचिकित्सा अधिकारी निशा चांदकेरांनी तर आभार निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. हेमचंद कन्नाके यांनी मानले.

यावेळी मेट्रन माया आत्राम मेट्रन, प्राचार्य , पुष्पा पोटे, मंदा बोरकर, मंगला वरखड़े, सुजाता मंडल, माधुरी कुळसंगे, योगेंद्र इंदोरकर, नयना चौके, दिपक डंबारे, विकास वाढई, अनिल मल्लोजवार तसेच कार्यालयीन कर्मचारी व नर्सिंग स्कूलचे प्राध्यापक व विद्यार्थी आदी उपस्थित होते.

## मेन रोडच्या बाजूला नालीचे बांधकाम न केल्यामुळे शंकरपुरात घाणीचे साम्राज्य

### नालीचे बांधकाम त्वरित करा भावनाताई बावनकर यांची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. २५ जुलै :** चिमूर नागपूर व्हाया शंकरपूर हा राष्ट्रीय महामार्ग आहे. या मार्गावर पंधरा हजार लोकवस्तीचे शंकरपूर हे मोठे बाजारपेठेचे ठिकाण असून गावातील मध्यभागातून हा राज्य महामार्ग जातो. या राज्य महामार्गाला लागून व्यापारी संकुल त्यामध्ये असणारे मोठमोठे व्यापाऱ्यांचे दुकान तसेच काही खाजगी घरे आहेत. या रोडला मोठमोठे खड्डे पडल्याने आणि घरासमोर व दुकानासमोर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने शंकरपूर वासीयांना मोठा त्रास होत आहे. तीन दिवसापासून होत असलेल्या संततधार पावसामुळे गावामध्ये साथीचे रोगाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्याने या रोडच्या नाल्याचे बांधकाम त्वरित करण्यात यावे, अशी मागणी पंचायत समितीचे माजी सदस्य भावनाताई बावनकर यांनी केली आहे.



दोन वर्षे आधी या रोडवर मोठ मोठे खड्डे पडल्याने अपघाताचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले होते. याबाबत अनेक प्रकारच्या तक्रारी, रास्ता रोको जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सतीश वारजूकर यांचे नेतृत्वात नागरिकांकडून करण्यात आले होते. तेव्हा कुठे दोन वर्षानंतर मागील वर्षी सार्वजनिक बांधकाम विभागाने गावातील राज्य महामार्गाचे काम पूर्ण केले. परंतु गावामधून रोड उंच झाल्याने आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने नाल्याचे बांधकाम न केल्यामुळे रोड लगत असलेल्या दुकानांमध्ये व घरांमध्ये पावसाचे पाणी शिरत आहे. आणि चकजाटेपार रोडच्या दोन्ही बाजूला नाल्याचे बांधकाम झाले असल्याने त्या संपूर्ण रोडचे पाणी या राज्य महामार्गाच्या रोडकडे येत असल्याने या राज्य महामार्गाच्या बाजूला मोठ्या प्रमाणात पावसाची पाणी जमा होत आहे. या पावसाच्या साचलेल्या पाण्यामुळे ठिकठिकाणी खड्डे तसेच खोलगट भाग निर्माण झाला असून रोड लगत नाल्या नसल्याने साचलेले पाणी हे गावाबाहेर निघत नाही. त्यामुळे दुकानांच्या आणि घरांच्या समोर साचलेल्या पाण्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. आणि घरांमध्ये डासांचे प्रमाण वाढले आहे. परंतु मागील वर्षी झालेल्या या रोड लगत साचलेल्या पाण्यामुळे व्यापाऱ्यांच्या दुकानाच्या समोर पाणी साचले असल्याने व्यवसाय करणे ही कठीण झाले आहे.

## जि. प. हायस्कूल राजुरात माजी विद्यार्थ्यांकडून वृक्षारोपण

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. २५ जुलै :** एक पेड माँ के नाम' उपक्रम अंतर्गत जिल्हा परिषद हायस्कुल राजुरा येथील माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरात विविध प्रजातीचे वृक्षारोपण केले




### भारत सरकार, रेल्वे मंत्रालय

### रेल्वे भरती बोर्ड

### केंद्रीकृत रोजगार सूचना (सीईएन)संख्या ०३/२०२५

### पॅरामेडिकल श्रेणींच्या विविध पदांसाठी भरती

**सूचक सूचना**

खाली दिलेल्या वेळापत्रकात दिलेल्या विविध कोटींच्या पदांसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागिवले जात आहेत. अर्ज जमा करण्याची अंतिम तारीख ०८/०९/२०२५ आहे. सर्व प्रकारे पूर्ण अर्ज **फक्त ऑनलाईन** जमा करण्यात यावेत.

**महत्वपूर्ण तारीख**

**अर्ज सुरु होण्याची तारीख** : ०९-ऑगस्ट-२०२५

**अर्ज जमा करण्याची शेवटची तारीख** : ०८-सप्टेंबर-२०२५ (२३:५९ वा.)

| पदांचे नाव | ७व्या सीपीसी नुसार पे लेवल | प्रारंभिक वेतन | चिकित्सा मानक | ०१/०१/२०२६ रोजी वय | सर्व आरआरबीमध्ये एकूण रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| नर्सिंग अधीक्षक | ७ | ४४९०० | C१ | २०-४० | २७२ |
| डाईलायसिस टेक्निशियन | ६ | ३५४०० | B१ | २०-३३ | ४ |
| स्वास्थ्य आणि मलेरिया निरीक्षक ग्रेड।। | ६ | ३५४०० | C१ | १८-३३ | ३३ |
| फार्मासिस्ट (एंट्री ग्रेड) | ५ | २९२०० | C२ | २०-३५ | १०५ |
| रेडियोग्राफर एक्स-रे टेक्निशियन | ५ | २९२०० | B१ | १९-३३ | ४ |
| ईसीजी टेक्निशियन | ४ | २५५०० | C१ | १८-३३ | ४ |
| लेबोरेटरी सहाय्यक ग्रेड ।। | ३ | २१७०० | B१ | १८-३३ | १२ |
| | | | | एकूण (सर्व रे.भ.बो.) | ४३४ |

ऑनलाइन अर्ज भरताना उमेदवारांनी आधार वापरून त्यांचे प्राथमिक तपशील पडताळून पाहावेत, जेणेकरून आधार नसलेल्या अर्जांसाठी भरती प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर विशेष तपशीलवार छाननीमुळे होणारी गैरसोय आणि अतिरिक्त विलंब टाळता येईल. आधार वापरून यशस्वी पडताळणी करण्यासाठी, आधारमधील नाव आणि जन्मतारीख दहावी उत्तीर्ण प्रमाणपत्रात उपलब्ध असलेल्या पूर्ण नाव आणि जन्मतारखेशी १००% जुळेल अशा प्रकारे अपडेट करावी. त्याचप्रमाणे, ऑनलाइन अर्ज भरण्यापूर्वी आधार नवीनतम फोटो आणि नवीनतम बायोमेट्रिक्स (फिंगरप्रिंट आणि आयरिस) सह अपडेट करणे आवश्यक आहे.

ही सूचना पूर्णपणे सूचक स्वरूपाची आहे. संपूर्ण तपशीलांसाठी, अर्जदारांना ऑनलाइन अर्ज भरण्यापूर्वी तपशीलवार सीईएन क्रमांक ०३/२०२५ (पॅरामेडिकल) पूर्णपणे वाचण्याचा सल्ला देण्यात येत आहे. संपूर्ण अधिसूचना आणि उपरोक्त भरतीशी संबंधित कोणतेही शुद्धीपत्रक/परिशिष्ट/महत्वाची सूचना वेळोवेळी खाली सूचीबद्ध केलेल्या आरआरबीच्या वेबसाइटवर प्रसिध्द केली जाईल:

**सीईएन सं. ०३/२०२५ मध्ये सहभागी होणाऱ्या रेल्वे भरती बोर्डाची वेबसाईट**

| | | |
|---|---|---|
| अहमदाबाद www.rrbahmedabad.gov.in | गुवाहाटी www.rrbguwahati.gov.in | प्रयागराज www.rrbald.gov.in |
| अजमेर www.rrbajmer.gov.in | जम्मू श्रीनगर www.rrbjammu.nic.in | रांची www.rrbranchi.gov.in |
| भोपाळ www.rrbbhopal.gov.in | कोलकाता www.rrbkolkata.gov.in | सिकंदराबाद www.rrbsecunderabad.gov.in |
| भुवनेश्वर www.rrbbbs.gov.in | मालदा www.rrbmalda.gov.in | सिलिगुडी www.rrbsiliguri.gov.in |
| बिलासपूर www.rrbbilaspur.gov.in | मुंबई www.rrbmumbai.gov.in | बेंगळुरु www.rrbbnc.gov.in |
| चंदीगढ www.rrbcdg.gov.in | मुजफ्फरपूर www.rrbmuzaffarpur.gov.in | गोरखपूर www.rrbgkp.gov.in |
| चेन्नई www.rrbchennai.gov.in | पाटना www.rrbpatna.gov.in | |

क्र. आरआरबी/पैट/०३-२५(पॅरामेडिकल)/२०२५/०५
दिनांक :२६/०७/२०२५

अध्यक्ष
रेल्वे भरती बोर्ड

"फसवणूक करणारे, दलाल आणि नोकरी मिळवून देण्याचे खोटे आश्वासन देणाऱ्यांपासून सावध रहा" Sai/309


# मोरांडे कुटुंबीयांचा मातृस्मृतीला अनोखा अभिवादन

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. २५ जुलै :** तालुक्यातील पुयारदंड गावाजवळ वृद्धाश्रम येथे मॅजिक अकॅडमी या माना समाजातील आर्थिक दुर्बल घटकांतील युवक-युवतींसाठी स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी व रोजगाराभिमुख प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेला मोरांडे कुटुंबीयांनी पारंपरिक तेरावा आणि वर्षश्राद्धाच्या खर्चाला सामाजिक कार्याची जोड देत, मोरांडे बंधू-भगिनी यांनी त्यांच्या आई, स्वर्गीय शकुंतलाताई मोरांडे या-ंच्या स्मृतीप्रीत्यर्थ मॅजिक अकॅडमी ला एक संगणक संच आणि २१ फळ-झाड सपप्रेमभेट म्हणून शनिवार ला सुपूर्द केल्या.

माजी राज्यमंत्री डॉ. रमेशकुमार गजभे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेली मॅजिक अकॅडमी ही संस्था माना समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास युवक-युवतींना स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी मोफत निवास, भोजन, अभ्यासिका आणि अभ्यास साहित्य पुरवते. विशेष म्हणजे, या संस्थेचे दैनंदिन व्यवस्थापन आणि नियोजनाची जबाबदारी येथील निवासी विद्यार्थीच सांभाळतात. आतापर्यंत अनेक विद्यार्थ्यांनी या संस्थेच्या माध्यमातून रोजगार मिळवला असून, माजी विद्यार्थ्यांच्या देणग्या आणि इतर दात्यांच्या सहकार्याने संस्थेचा खर्च भागवला जातो.

### मॅजिक अकॅडमीला संगणक संच भेट



१९ जुलै शनिवार ला मोरांडे कुटुंबीयांनी विद्यार्थ्यांसाठी एक संगणक संच आणि २१ फळ झाडांची रोपटी भेट म्हणून सुपूर्द केला. निसर्गरम्य परिसरात स्वप्नपूर्तीसाठी झटणाऱ्या या युवक-युवतींना भेटून मोरांडे कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले. 'या आधी बाबांच्या स्मृतीनिमित चिकमारा येथील जि. प. शाळेला लोखंडी गेट आणि आता आमच्या आईच्या स्मृतिदिनानिमित्त भावी पिढीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी योगदान देण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे. या तरुणाईच्या उज्ज्वल भविष्यासाठी आम्हाला हातभार लावता आला, याचा आनंद आहे,' असे मोरांडे कुटुंबीयांनी सांगितले.

मॅजिक अकॅडमी या प्रेरणादायी उपक्रमाला आणि सामाजिक बांधिलकीच्या भावनेला सलाम करत, मोरांडे कुटुंबीयांचे हे योगदान इतरांसाठीही प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास आहे.

### अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क

## आकारणाऱ्या महाविद्यालयांवर होणार कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २५ जुलै :** समाज कल्याण विभागाच्या भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत राज्यातील कनिष्ठ, वरिष्ठ, व्यावसायिक, बिगर व्यावसायिक अनुदानित महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृती प्रदान केली जाते. नागपूर विभागात दरवर्षी सुमारे ७० हजार विद्यार्थी या योजनेचा लाभ घेतात.

सन २०२५-२६ सत्रामध्ये काही महाविद्यालयांकडून प्रवेशाच्या वेळी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क आकारण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. हे शासन निर्णयाचे उल्लंघन आहे. शासनाने स्पष्ट केले आहे की, पात्र विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे शिक्षण शुल्क घेता कामा नये.

शिष्यवृत्ती योजना सुरळीतपणे व वेळेवर अंमलात आणण्यासाठी महाडीबीटी ही संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली असून, या प्रणालीद्वारे शिष्यवृत्ती थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते. यामुळे विद्यार्थ्यांना आणि महाविद्यालयांना आवश्यक निधी वेळेत उपलब्ध होतो. काही महाविद्यालयांकडून शिक्षण शुल्काची मागणी केली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. याबाबत शासनाने सबंधित महाविद्यालयांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

पात्र विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क घेणाऱ्या तसेच आवश्यक कागदपत्रांची अडवणूक करणाऱ्या नागपूर विभागातील सर्व महाविद्यालयांवर कठोर कारवाई करण्यात येईल, अशा स्पष्ट सुचना नागपूर येथील समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुळकर्णी यांनी दिल्या आहेत.

## मनपात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती साजरी

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २५ जुलै :** भारतीय असंतोषाचे जनक, स्वातंत्र्यलढयाचे थोर स्वातंत्र्यसेनानी, राष्ट्रभक्त लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंती निमित्त चंद्रपूर महानगरपालिकेच्या वतीने २३ जुलै रोजी सकाळी ११ वाजता विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी बोलतांना मार्गदर्शन करतांना अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील यांनी सांगितले की, लोकमान्य टिळक केवळ स्वातंत्र्यलढ्याचे आद्य प्रवर्तक किंवा स्वातंत्र सेनानी नव्हते तर त्याही पलीकडे ते गणिततज्ज्ञ, खगोलशास्त्रज्ञ, कवी, लेखक, वक्ते, पत्रकार, शिक्षक, राजकारणातील द्रष्टेपणा असलेले लढवय्ये, भारतीय असंतोषाचे जनक असे अष्टपैलू व्यक्तिमत्व होते. लोकमान्य टिळकांनी दिलेला 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे,' या घोषणेने देशाच्या स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास बदलण्यास ह ब्रिटिश राजवटीला उलथून टाकण्याचा आत्मविश्वास भारतीयांमध्ये जागवला.



मनपा मुख्य इमारतीत लोकमान्य बाळ गंगाधर टिळक या-ंच्या प्रतिमेला अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील यांनी माल्यार्पण करून करुन विनम्र अभिवादन केले. याप्रसंगी उपायुक्त संदीप चीद्रा-वार, डॉ.नरेंद्र जनबंधु, माधवी दाणी, प्रदीप पाटील, ग्रेस नगरकर व अधिकारी कर्मचारी उपस्थीत होते.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर
मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक
मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३
※ स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी ※ (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

